<u>नि. १६ खाली आदेश</u>

१. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्रं १ ते ३ तर्फे त्यांचे विरुध्द झालेला दावा एकतर्फो चालविण्यात यावा असा पारित झालेला आदेश रदद करुन प्रतिवादींची कैफियत व जबाब दाखल करण्यास परवानगी देण्यात यावी याकरिता दाखल केला आहे.

२. प्रतिवादीचे म्हणणे असे की, वादीने प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीचे संदर्भात मनाई मिळणे कामी दाखल केलेला आहे. वादी व प्रतिवादी हे जवळचे नातेवाईक आणि जवळजवळ राहणारे आहेत. या प्रतिवादींच्या म्हणण्यानुसार वादी यांनी गैरसमजातुन प्रस्तुतचा दावा दाखल केल्याचे दिसुन येते. दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर या प्रतिवादींनी या दाव्याचे संदर्भात माहिती त्यांचे भावकीतील मंडळी आणि काही नातेवाईकांना दिली. वादी व प्रतिवादी यांचे भावकीतील ज्या मंडळींना आणि नातेवाईकांना दाव्याची माहिती दिली त्यावेळी आपण घरातले प्रकरण घरात मिटवुयात, आम्ही वादींची भेट घेउन त्यांना त्यांचे मन वळविण्याचा प्रयत्न करतो, तुम्ही कोर्टात हजर होउन विनाकारण प्रकरण वाढवुन नका असा सल्ला जवळच्या भावकीतील लोकांनी आणि नातेवाईक यांनी दिला. त्यावर विश्वास ठेवुन दि.११/०८/२०२२ रोजी हे प्रतिवादी मेहरबान न्यायालयात हजर झाले नाहीत. त्यामुळे विरुध्द झालेला दावा एकतर्फो चालविण्यात यावा असा पारित झालेला आदेश रदद करुन प्रतिवादींची कैफियत व जबाब दाखल करण्यात यावा अशी विनंती केली.

३. प्रस्तुत अर्जावर वादी तर्फे जबाब दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादीने दिलेला सदरचा अर्ज हा खोटा व बनावट स्वरुपाचा असल्याने त्यामध्ये नमुद केलेला मजकुर या वादीस मान्य व कबुल नाही. प्रतिवादी हे आडदांड व खुनशी स्वभावाचे असुन ते वादीस नेहमीच कोणत्या न कोणत्या कारणाने त्रास देत असतात. अर्जामध्ये नमुद केलेले इसम नामे संजय गोळे, दिपक शेटे व सोमनाथ शेटे यांनी आजपर्यंत कधीही या वादीशी संपर्क साधलेला नाही. केवळ या दाव्याचे कामकाज लांबणीवर पडण्याचा दुष्ट हेतुने प्रतिवादीने सदरचा अर्ज दाखल केला आहे. वादीचे त्यांचे घर मिळकतीमधुन दक्षिणेकडे असणार मुख्य रस्त्याकडे जाणेकरीता वादीचे वहीवाटीचे रस्त्यामध्ये प्रतिवादींनी दगड धोंडे टाकुन

अडथळा निर्माण केला आहे. तसेच गाडया लावुन अडथळा निर्माण करतात व वादीची धारकोंड करतात व कोर्टातील कामकाज लांबणीवर टाकण्याच्या दुष्ट हेतुने सदरील अर्ज दिला असल्यामुळे प्रतिवादीचा अर्ज नामंजुर करुन जास्तीत जास्त कॉस्ट करण्यात यावी, अशी विनंती केली.

४. प्रस्तुत अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्याचे समन्स मिळाल्यानंतर या प्रतिवादींनी या दाव्याचे संदर्भात माहिती त्यांचे भावकीतील मंडळी आणि काही नातेवाईकांना दिली. वादी व प्रतिवादी यांचे भावकीतील ज्या मंडळींना आणि नातेवाईकांना दाव्याची माहिती दिली त्यावेळी आपण घरातले प्रकरण घरात मिटवुयात असे म्हणाल्यामुळे प्रतिवादी हे कोर्टात हजर राहिले नाही व कैफियत व म्हणणे अभिलेखावर दाखल केले नाही. प्रतिवादींनी या कथनांच्या पुष्ठयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केलेले आहे. अभिलेखावरुन असे दिसुन येते की, प्रतिवादीं विरुध्द दि. ११/०८/२०२२ रोजी विरुध्द झालेला दावा एकतर्फो चालविण्यात यावा असा पारित झालेला आदेश पारित झालेला आहे.

५. प्रस्तुतचा दाव्यामध्ये वादीने प्रतिवादीं विरुध्द ठराव व मनाईची मागणी केलेली आहे. त्यामुळे सदर दावा गुणदोषावर चालविणेसाठी प्रतिवादींचे म्हणणे दाखल करुन घेणे न्यायोचित आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा हुकुमद रदद करणे गरजेचे आहे. प्रतिवादींनी त्याच्या अर्जामध्ये नमूद केलेली कारणे त्यांचे विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रदद करण्यायोग्य व समाधानकारक आहे. सदरचा अर्ज मंजुर केल्याने वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही याउलट सदरचा दावा गुणदोषावर चालविण्यास व न्यायदान करण्यास उपयुक्त होईल. प्रतिवादी हे दाव्याकामी हजर न झाल्याने वादीची गैरसोय झालेली आहे ज्याची भरपाई वादीस वाद खर्च देवून करता येईल.

६. या ठिकाणी ध्यानात घेणे गरजेचे आहे की, प्रतिवादीं विरुध्द एकतर्फा असा आदेश पारित करण्यात आलेला आहे. परंतु प्रतिवादींनी नमुद केलेली कारणे लक्षात घेता सदरचा एकतर्फा आदेश रदद करण्यायोग्य व संयुक्तीक आहे. म्हणून सर्वबाबी व परिस्थिती तसेच नैसर्गिक न्यायतत्व ध्यानात घेता, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर करणे उचित होईल. सबब खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात आला:

<u>आदेश</u>

१. अर्ज (नि.१६)खर्चासह मंजूर करण्यात आला.

२. प्रस्तुत दाव्यात दि.११/०८/२०२२ रोजी प्रतिवादी क्रं १ ते ३ यांचे विरुध्द दावा एकतर्फा चालविण्यात यावा असा पारित झालेला हुकूम रद्द करण्यात येतो. तत्पूर्वी प्रतिवादी क्रं १ ते ३ यांनी वादीस रु.३००/- वाद खर्च द्यावा.

(ह.उ.उ.पाटील)
सह दिवाणी न्यायाधीश, भोर
जि.पुणे.

दिनांक : १५/१०/२०२२

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment.

Name of the Stenographer : V.G.Fulari

Name of Court : H.U.U. Patil- Jt.CJJD, Bhor.

Date of Dictation : 15/10/2022

Judgment signed by the P.O. On : 15/10/2022

Judgment uploaded on : 15/10/2022.